# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 26.12.2025 वार- शुक्रवार

---

**कार्यशाळा**

सहकारा अंतर्गत सहकार या उक्तीप्रमाणे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक पहिल्यापासूनच काम करत असून, सहकार चळवळ वाढीसाठी हे एक बळकट पाऊल असल्याचे गौरवोद्गार पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी काढले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं जारी केलेली सुधारीत धोरणं आणि बँकांची प्रचलित धोरणं यांचा तुलनात्मक अभ्यास करून, सुधारीत धोरणं, कार्यपद्धती आणि अंमलबजावणीबाबतचा कृती आराखडा तयार करण्याकरता पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी दुर्गाडे बोलत होते.  राज्यातील 15 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे वरिष्ठ अधिकारी या कार्यशाळेला उपस्थित होते.

**नवीन बस**

पुढच्या वर्षी मे महिन्यापर्यंत 'पीएमपी'च्या ताफ्यात अडीच हजार नवीन बस दाखल होणार आहेत. त्यामुळे बस मार्गांची पुनर्रचना आणि फेऱ्यांच्या संख्येबाबत पीएमपी प्रशासन पुनरावलोकन करत आहे. प्रवासी सेवा अधिक मजबूत करण्यासाठी पीएमपी प्रशासन विस्तृतपणे नियोजन करत आहे. बसची वाट पाहण्याचा कालावधी कमी करण्यावरही भर दिला जात असल्याची माहिती पीएमपी प्रशासनानं दिली आहे.

**मतदान जागृती**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महापालिका हद्दीत व्यापक मतदान जनजागृती मोहीम सुरू आहे. फ्लॅश मॉब, पथ नाट्य इत्यादींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करून त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे.
यावेळी उपस्थित नागरिकांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली त्याबरोबरच कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू असा निर्धार व्यक्त केला.

**निलंबन**

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेच्या विविध कार्यालयातील कर्मचाऱ्यांना निवडणूक कामकाज सोपवण्यात येत आहे. मात्र काही कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या कार्यालयाकडे हजर न झाल्याने निवडणूक विषयक कामामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिला आहे.

दरम्यान निवडणूक कामासाठी हजर न झाल्यामुळे महापालिकेच्या कोथरुड क्षेत्रिय कार्यालयातील कनिष्ठ अभियंता महिलेच्या निलंबनाचे आदेश संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**एआयसेंटर**

येत्या रविवारी बारामती इथं देशातल्या सर्वात अत्याधुनिक आणि ग्रामीण जीवनाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या कृत्रिम बुद्धीमत्ता केंद्राचं उद्घाटन होणार आहे. विद्या प्रतिष्ठान शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलेन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स असं नाव असलेल्या या संस्थेचं उद्घाटन अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. बदलत्या काळाची पावलं ओळखत कृत्रिम बुद्धीमत्तेचं शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावं या उद्देशानं बारामतीत हे केंद्र सुरु होत आहे.

**पुरुषोत्तम करंडक**

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेच्या फुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला आज सुरुवात झाली. पुण्यासह रत्नागिरी, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि कोल्हापूर केंद्रांवर झालेल्या स्पर्धेतल्या बक्षीसप्राप्त एकांकिका अंतिम फेरीत सादर होतील.

**सायकलिंग स्पर्धा**

पुणे ग्रँड टूर चॅलेंज सायकलिंग स्पर्धा येत्या 19 ते 23 जानेवारी दरम्यान होणार आहे. ‘इंडिया A’ आणि ‘इंडिया B’ असे भारताचे दोन राष्ट्रीय संघ स्पर्धेत सहभागी होणार असून इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, चीन, मलेशिया, इंडोनेशिया आणि थायलंडच्या संघांनी स्पर्धेतला आपला सहभाग निश्चित केला आहे. 437 किलोमीटरच्या या स्पर्धेत मुळशी ते मावळ, पुरंदर ते सिंहगड खडकवासला परिसर, पश्चिम घाट आणि पुणे प्राइड लुक असे चार टप्पे असतील. पुणे प्राइड लुक या शेवटच्या टप्प्यात शहरातील आधुनिक आणि वारसा स्थळांना भेट दिली जाणार आहे.

**बॅडमिंटन**

योनेक्स सनराइझ डेक्कन जिमखाना आणि एस बी ए करंडक जिल्हा मानांकन बॅडमिंटन स्पर्धा कालपासून सुरू झाल्या. या स्पर्धेत 11 वर्षा खालील मुलांच्या गटात सात्विक गुप्ता, अरहित गंधम, गौतम साठे यांनी तर मुलींच्या गटात स्वरा पांडे, अनुषा जोशी यांनी विजयी सलामी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र असेल आणि किमान तापमान 10 अंश सेल्सिअसच्या आसपास असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**